नागपूर - मुंबई सुपर कम्युनिकेशन
एक्सप्रेस वे बांधणे.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-खाक्षेस-२०१६/ प्र.क्र.४६७/रस्ते-८**
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- १९ ऑगस्ट २०१६

**पार्श्वभूमी:-**

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि. ३१ जुलै २०१५ रोजी नागपूर - मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे हा महत्वांकाक्षी प्रकल्प हाती घेण्याची घोषणा केली आहे. या प्रकल्पामुळे ११ जिल्हे व सुमारे २० महत्वपूर्ण शहरे द्रुतगती मार्गाने राज्याच्या राजधानीशी जोडले जातील व शैक्षणिक, पर्यटन व वैद्यकीय सेवा संकुले तयार करण्यास मदत होणार असल्याने सदर नागपूर - मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे बांधणे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय:-**

मंत्रीमंडळ पायाभूत समितीच्या दि. ३०/११/२०१५ च्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार नागपूर - मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वे चे बांधकाम करणे या प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास "कार्यान्वयीन यंत्रणा" म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर प्रकल्पासाठी एमएसएच-३/ एनएएसजीएम (NASGM) च्या सर्वसाधारणपणे सानिध्यात तांत्रिक दृष्टया योग्य अशी Greenfield Alignment निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. प्रकल्पाच्या भूसंपादनाकरिता Annuity व MIDC च्या Land Pool Model चा अवलंब करण्यात यावा.

सदर प्रकल्पासाठी सुसाध्यता अभ्यास व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासंदर्भात पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने करावी. सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना सर्व Interchange पासून जवळच्या मुख्य शहरांसाठी Dedicated High Speed Spurs विकसित करण्याचा वावही सदर प्रकल्पात घेण्यात यावा. यासह प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास पायाभूत समितीची पुढील मान्यता घेण्यात यावी.

हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्रमांक २४२/१४६१, दिनांक ११/०७/२०१६ व क्रमांक १९२/व्यय-११, दिनांक ०२/०८/२०१६ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक. २०१६०८२०१२३५२७९७१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kishor Mali

Digitally signed by Kishor Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=P W D, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3bea341e42a830f751d11545299eb3fc25a8e20a7cb9d5c2f7f8a31a2b896be7, cn=Kishor Mali
Date: 2016.08.20 12:34:51 +05'30'

**(के.पी. माळी)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२) मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे खाजगी सचिव,
३) मा.राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे खाजगी सचिव,
४) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.रा.र.वि. महामंडळ, मुंबई.
५) निवड नस्ती.